सकाळ पु.पा.१.



**ऑनड्युटी**

बातमीदार, वसई

# पोलिस उपायुक्तांना मैदानी खेळाचा लळा

**मिरा-भाईंदर वसई-विरार पोलिस आयुक्तालयाचे उपायुक्त प्रकाश गायकवाड काम करताना आरोग्याची काळजी घेण्याचा पुरेपूर प्रयत्न करतात. वाढते प्रदूषण आणि हवामानात होणारे बदल मानवी जीवनावर परिणाम करतात; पण शारीरिकदृष्ट्या सक्षम राहण्यासाठी व्यायाम अन् मैदानी खेळ किती महत्त्वाचे आहेत याची जाणीव गायकवाड यांच्या कृतीतून दिसून येते.**

शारीरिक तंदुरुस्ती पोलिस दलात अत्यंत महत्त्वाची मानली जाते. अनेक वेळा व्यग्र दिनचर्येमुळे आरोग्याकडे लक्ष देणे शक्य होत नाही. वेळेवर आहार व झोप न मिळाल्याने आजार बळावत असतात; परंतु असेही पोलिस आहेत जे थोडा वेळ काढून व्यायाम व मैदानी खेळातून शारीरिक-मानसिकरीत्या सुदृढ राहण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यातील एक म्हणजे मिरा-भाईंदर वसई-विरार पोलिस आयुक्तालयाचे प्रकाश गायकवाड. ज्यांनी कुस्ती, बॅडमिंटन आणि मॅरेथॉनमध्ये आवड जपली आहे.

प्रकाश गायकवाड मूळचे नाशिकमधील. थेट पोलिस उपअधीक्षक म्हणून ते २००९ मध्ये दलात रुजू झाले. त्यांनी पालघरमध्ये काम केले आहे. त्यानंतर मिरा-भाईंदर वसई-विरार पोलिस आयुक्तालयात उपायुक्त म्हणून जबाबदारी सांभाळली आहे. लहानपणापासूनच त्यांना कुस्तीचे आकर्षण होते. त्यामुळे त्यांनी गावात कुस्तीत सहभाग घेतला.



प्रकाश गायकवाड
पोलिस उपायुक्त

त्यानंतर नाशिक व महाविद्यालयांतूनही ते आखाड्यात उतरले. पोलिस दलात रुजू झाल्यावर वेळ कमी मिळू लागला; परंतु तरीही कुस्तीचे धडे त्यांनी गिरवले. त्याचबरोबर त्यांना बॅडमिंटनचीही आवड आहे. पालघरमध्ये असताना ते बॅडमिंटन खेळत असत. आता पोलिस आयुक्तालयात असतानाही त्यांनी बॅडमिंटन सुरूच ठेवले आहे. रोजचा व्यायाम त्यांच्या दिनचर्येचा भाग झाला आहे. मन व इच्छाशक्तीची परीक्षा देत सकारात्मक प्रेरणा घेऊन गायकवाड विविध ठिकाणी होणाऱ्या मॅरेथॉनमध्येही सहभागी होतात. आतापर्यंत त्यांनी पुणे, पोलिस मॅरेथॉन, वसई-विरार राष्ट्रीय मॅरेथॉन, नाशिक आणि मुंबईसह विविध भागांत झालेल्या अर्धमॅरेथॉनमध्ये सहभाग घेत फिनिशिंग पॉइंट गाठला आहे. अनेक खेळांची आवड जपत पोलिस दलातच नव्हे; तर समाजापुढेही त्यांनी आदर्श निर्माण केला आहे. धकाधकीच्या जीवनात आरोग्याची हेळसांड पाहता पोलिसांसह नागरिकांनी मैदानी खेळाला महत्त्व देणे गरजेचे आहे, हे गायकवाड यांच्या इच्छाशक्तीवरून स्पष्ट होते.

> व्यायाम आणि मैदानी खेळाकडे तरुणवर्ग वळला, तर आपसूकच टीव्ही, मोबाईल आणि इंटरनेटच्या जाळ्यातून तो बाहेर येईल. अशा गोष्टीत अडकणार नाही. शारीरिक तंदुरुस्तीसाठी रोज व्यायाम व खेळाकडे वळायला हवे. जेणेकरून त्यातून आपल्याला मानसिक व शारीरिक समाधान मिळेल.
>
> - प्रकाश गायकवाड,
> पोलिस उपायुक्त



वसई : मॅरेथॉनमध्ये सहभागी झालेले मिरा-भाईंदर वसई-विरार पोलिस आयुक्तालयाचे प्रकाश गायकवाड.

सकाळ २१.५.२०

# गावठाण दर्जासाठी रहिवासी आक्रमक

## परिषदेची स्थापना; सक्रिय मोहीम सुरू करण्याचा निर्णय

भाईंदर, ता. २१ (बातमीदार) : मिरा-भाईंदरमधील अनेक गावांना अद्याप गावठाणाचा दर्जा मिळालेला नाही. गावठाण घोषित नसल्यामुळे जमिनी अजूनही स्थानिक रहिवाशांच्या नावे झालेल्या नाहीत. त्यामुळे नवीन घरबांधणी, घराची दुरुस्ती अशा विविध समस्यांना रहिवाशांना सामोरे जावे लागत आहे. या पार्श्वभूमीवर गावठाणाचा दर्जा मिळविण्यासाठी ग्रामस्थांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. काशी-मिरा भागातील पेणकर पाडा येथे नुकतेच गावठाण परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. गावठाणाचा दर्जा मिळण्यासाठी यापुढे सक्रिय मोहीम सुरू करण्याचा निर्णय या परिषदेत घेण्यात आला.

मिरा-भाईंदर शहराच्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या प्रारूप विकास आराखड्यात पेणकर पाड्यासह अनेक गावे गावठाण म्हणून दाखविण्यात आलेली नाहीत. दुसरीकडे नगर भूमापन विभागाकडून रहिवाशांना जमिनीच्या मालकी हक्काची सनद देण्याची कार्यवाहीदेखील रखडली आहे. त्यामुळे गावाला गावठाणाचा दर्जा मिळावा, तसेच जमिनीची सनद मिळण्याच्या कामाला गती मिळावी यासाठी पेणकर पाडा येथील ग्रामस्थांनी पुढाकार घेत गावठाण परिषदेचे आयोजन केले होते. यावेळी ग्रामस्थांसह सर्वपक्षीय स्थानिक नेत्यांनी उपस्थिती लावली होती. यावेळी शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष प्रभाकर म्हात्रे, माजी नगरसेवक हरेश गावंड, मोहन म्हात्रे, सोमनाथ पवार, नवनाथ पवार, लक्ष्मण पाटील, लक्ष्मण कांदळगावकर, दीपेश गावंड उपस्थित होते.



भाईंदर : पेणकर पाडा येथे ग्रामस्थांच्या पुढाकाराने गावठाण परिषद पार पडली.

### कर्जही मिळेना

जमिनी ताब्यात असतानाही त्यावरचा मालकी हक्क सिद्ध होत नसल्यामुळे रहिवाशांना नवीन घरबांधणी अथवा जुन्या घरांच्या दुरुस्तीसाठी परवानगी मिळत नाही, तसेच घरासाठी कर्जही मिळत नाही. त्यामुळे रहिवाशी गावठण दर्जासाठी मिळवण्यासाठी आक्रमक झाले आहेत.

### ग्रामस्थांच्या शंकांचे निवारण

परिषदेत शेतकरी प्रबोधिनीचे अध्यक्ष राजाराम पाटील यांनी ग्रामस्थांना मार्गदर्शन केले. यावेळी गावठाण करण्याच्या दृष्टीने प्रशासकीय कार्यवाही संदर्भात चर्चा करण्यात आली, तसेच ग्रामस्थांच्या शंकांचे निवारणदेखील करण्यात आले. परिषदेच्या माध्यमातून जमिनी मालकीच्या करण्यासाठी व गावठाण घोषित करण्याच्या मागणीसाठी सक्रिय मोहीम उभारण्याचा निर्णय घेण्यात आला.

CamScanner

पुढारी पा-नं ७.

# २०४७ पर्यंत भारताच्या इस्लामीकरणाचा कट

## 'पीएफआय'विरुद्ध 'एनआयए'चे बंगळुरू विशेष न्यायालयात आरोपपत्र

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

कर्नाटकमधील दक्षिण कन्नड जिल्ह्यातील बेल्लारे येथे २६ जुलै २०२२ रोजी भाजप नेते प्रवीण नेत्तारू यांची हत्या झाली होती. या हत्येत 'पीएफआय' या बंदी घालण्यात आलेल्या फुटीरवादी संघटनेचा हात होता. अशा जिहादी कृत्यांच्या माध्यमातून येत्या २०४७ पर्यंत भारताचे संपूर्ण इस्लामीकरण करण्याचा कट या संघटनेने रचला होता, असे पीएफआयच्या २० सदस्यांविरुद्ध बंगळुरू विशेष न्यायालयात 'एनआयए'ने शुक्रवारी दाखल केलेल्या आरोपपत्रात म्हटले आहे.

नेत्तारू यांच्या हत्येच्या तपासादरम्यान देशात विशिष्ट समुदायाची दहशत निर्माण करणे, जातीय द्वेष आणि अशांतता पसरवणे व २०४७ पर्यंत भारतात इस्लामिक राजवट प्रस्थापित करणे हा या संघटनेचा डाव असल्याचेही उघडकीस आले. संघटनेच्या बैठकीत मुस्तफा पाचर याला जिल्ह्यातील विशिष्ट समुदायातील विशेष व्यक्तींचे हत्याकांड घडवून आणण्यासाठी त्यांची ओळख पटविण्याची तसेच त्यांच्यावर पाळत ठेवण्याची जबाबदारी देण्यात आली होती. त्यानुसार चार जणांची हत्या करण्याचे ठरले. पहिला हल्ला प्रवीण नेत्तारू यांच्यावर करण्यात आला. नेत्तारू भाजप युवा मोर्चाचे सदस्य होते.

पीएफआयच्या या २० सदस्यांपैकी ६ जण अद्यापही फरार आहेत. माहिती देणाऱ्यांना बक्षीसही जाहीर करण्यात आले आहे. भा.दं.वि. कलम १२० ब, १५३ अ, ३०२ व ३४ आणि बेकायदा क्रियाकलाप (प्रतिबंध) कायदा, १९६७च्या कलम १६, १८ व २० तथा कलम २५ (१) (र) अंतर्गत सर्व आरोपींविरुद्ध आरोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

**दुकान बंद करून परतताना हत्या**

२६ जुलै २०२२ रोजी प्रवीण पोल्ट्रीचे दुकान बंद करून घरी परतत असताना दुचाकीवरून आलेल्या काही जणांनी त्यांचा रस्ता अडवला. त्यांनी प्रवीणवर कुऱ्हाडीने वार केले. प्रवीण यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. प्रवीण यांचे पार्थिव त्यांच्या मूळ गावी नेत्तारू येथे आणण्यात आले होते.

- **भाजप नेते नेत्तारू यांची हत्या हा सुनियोजित कट**
- **आणखी तीन स्थानिक नेते होते पीएफआयच्या यादीत**
- **पीएफआयच्या २० सदस्यांपैकी ६ जण अद्याप फरार**




### सर्व्हिस टीम अन् किलर स्क्वॉड्स!

इस्लामी राष्ट्र निर्मितीची कारस्थाने प्रत्यक्षात आणण्यासाठी जिहादी पथकांची स्थापनाही पीएफआय संघटनेकडून करण्यात आली होती. या पथकांना सर्व्हिस टीम किंवा किलर स्क्वॉड्स असे नाव देण्यात आले, असेही एनआयएने स्पष्ट केले आहे.

CamScanner

सकाळ ५.५.२०.




वसई : रस्ते सुरक्षा अभियान सप्ताहात विद्यार्थ्यांना प्रशस्तिपत्रक देऊन गौरविण्यात आले.

# रस्ते सुरक्षा अभियानात विद्यार्थ्यांचा सहभाग

वसई, ता. २१ (बातमीदार) : भाऊसाहेब वर्तक महाविद्यालयाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभाग, उपप्रादेशिक परिवहन कार्यालय वसई यांच्यावतीने रस्ते सुरक्षा अभियान सप्ताह नुकतेच पार पडले. यात महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

रस्ते सुरक्षा अभियान सप्ताहात सहाय्यक पोलिस निरीक्षक प्रीतम वाघ, सहायक निरीक्षक नीलेश जगताप यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाने आयोजित केलेल्या चित्रकला स्पर्धा आणि घोषवाक्य स्पर्धेत महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी आणि श्रीमती तारामाई वर्तक मेमोरियल अकादमी सीबीएसई शाळेच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यावेळी पोलिस उपनिरीक्षक अनिकेत गुंजाळ, पोलिस उपनिरीक्षक नीलेश जगताप, महाविद्यालयाच्या पर्यवेक्षिका डॉ. शीतल कोरडकर, श्रीमती तारामाई वर्तक मेमोरियल अकादमी शाळेच्या प्र. मुख्याध्यापिका रचना शर्मा उपस्थित होत्या.

लोकमत ५.०.५.

# पत्नीची विवस्त्र छयाचित्रे पाठवून मागितली खंडणी

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** महिलेचा मोबाइल हॅक करून तिची विवस्त्र अवस्थेतील छायाचित्रे तिचा पती आणि बहिणीला व्हॉट्स ॲपवर पाठवून ती छायाचित्रे सर्वत्र व्हायरल करण्याची धमकी देत पतीकडे ५ लाखांची मागणी करणाऱ्या अनोळखी व्यक्तीविरुद्ध नवघर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

३८ वर्षीय महिलेच्या पतीला त्याच्या पत्नीच्या मोबाइलवरून तिचे छायाचित्रे व्हॉट्स ॲपद्वारे आली. त्याने पत्नीला कॉल करून विचारणा केली असता तिने आपला मोबाइल कोणीतरी हॅक केल्याचे सांगितले. पतीने पत्नीचा मोबाइल ब्लॉक केला. काही वेळाने दुसऱ्या अनोळखी क्रमांकावरून पुन्हा पतीला पत्नीची विवस्त्र अवस्थेतील छायाचित्रे व्हॉट्स ॲपवर आली. त्यासोबत तुझ्या पत्नीचे विवाहबाह्य संबंध असल्याचा संदेशही पाठवण्यात आला. नंतर त्यावरून कॉल आला आणि ५ लाख दिले नाही, तर पत्नीची सर्व विवस्त्र छायाचित्रे कुटुंबीयांच्या ग्रुपवर तसेच ऑनलाइन व्हायरल करेन, अशी धमकी देण्यात आली.

पुढारी ५१-नॉ-९.

# सराईत सोनसाखळी चोरांना धाडले तुरुंगात

## मुंबई पोलिसांची नालासोपाऱ्यात कारवाई



**ठाणे : पुढारी डेस्क**

सोनसाखळी, मंगळसूत्र चोरणाऱ्या दोन सराईत चोरांना तुरुंगात धाडण्यात आले आहे. ही कारवाई मुंबई पोलीस दलाच्या जुहू पोलिसांनी नालासोपाऱ्यात केली. या कारवाईमुळे २ गुन्ह्यांची उकल झाली असून गुन्ह्यात वापरलेली मोटारसायकल व पळवलेले मंगळसूत्र जप्त करण्यात आले आहे.

जुहू परिसरात राहणारी महिला १७ जानेवारी रोजी सकाळी ६.४५ वाजण्याच्या सुमारास दूध आणण्यासाठी जात होती. त्यावेळी दुचाकीवरून आलेल्या चोरांनी त्यांच्या गळ्यातील मंगळसूत्र खेचून सुसाट निघून गेले. या प्रसंगातून स्वत:ला सावरत महिलेने पोलीस ठाणे गाठले. महिलेच्या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात चोरांविरुद्ध गुन्हा दाखल केला. या गुन्ह्याचा तपास वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरणचे पथक करू लागले. तपासादरम्यान पोलिसांनी तांत्रिक माहितीच्या आधारे नालासोपारा परिसरातून आरोपी सुनील सकपाळ ऊर्फ भाई (३९) व सुरेश निषाद ऊर्फ सुजया (२९) याच्या मुसक्या आवळल्या. या कारवाईदरम्यान महिलेचे पळवलेले ४० हजारांचे मंगळसूत्र व १ लाखांची बाईक पोलिसांनी जप्त केली. या आरोपींच्या अटकेमुळे विलेपार्ले पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्ह्याची उकल झाली आहे. हे आरोपी पोलीस रेकॉर्डवरील असून सुनीलवर ४० तर सुरेशवर १० हून अधिक गुन्हे दाखल असल्याचे उघडकीस आले आहे.

ही कारवाई परिमंडळ ९ चे उपायुक्त अनिल पारस्कर, एसीपी जयप्रकाश भोसले, वपोनि अजितकुमार वर्तक, पोनि (गुन्हे) संजय पवार यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरणचे अधिकारी सपोनि विजय धोत्रे, पोउपनि अभिषेक पाटील, हवालदार तोडणकर, गजानन पाटील, अतिश पाटील व अन्य पथकाने केली.

पुढारी ५१-नॉ-८.

# भाईंदरमधून बांगलादेशीच्या आवळल्या मुसक्या

**मिरारोड :** नवघर पोलीस ठाणे हद्दीतील बी. पी. क्रॉस रोड या भागात पासपोर्ट, व्हिसाशिवाय राहणाऱ्या एका बांगलादेशी नागरिकाला नवघर पोलीस ठाणे दहशदवाद विरोधी पथकाने अटक केली आहे.

एक बांगलादेशी नागरीक बी. पी. क्रॉस रोड, भाईंदर पूर्वेला कामानिमित्त येणार आहे. त्यानुसार बी. पी. रोड, भाईंदर पूर्व, याठिकाणी पोलीस गेले असता त्यावेळी एक संशयित इसम त्या ठिकाणी येत तो मॅनेजरकडे कामा विषयी विचारपूस करत असताना दिसला. त्यावेळी त्या इसमाकडे चौकशी केली असता अफजल बकर अली मंडल असे नाव असून तो सद्या बंगा संघ झोपडपट्टी, भाईंदर पूर्व, येथे राहत होता. भारतीय पारपत्र अधिनियमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

1997 से

KAT खबरें आज तक

not a publication of the living media india group

वर्ष: 26 अंक-219 मुंबई, रविवार 22 जनवरी 2023 पृष्ठ-12 मूल्य : 2.00

# कमिश्नर मधुकर पांडेय की पहल: शनिवार को थाने में शिकायत निवारण कैंप, शिकायतकर्ता के चेहरे पर रौनक

**विरार :** पुलिस स्टेशनों के चक्कर लगाने वाले परेशान नागरिकों की सुविधा के लिए एमबीवीवी पुलिस ने अच्छा पहल करते हुए २१ जनवरी ( शनिवार ) को विरार पुलिस स्टेशन में शिकायत निवारण कैंप लगाया गया, थाना प्रभारियों ने २ डेस्क लगाकर समस्याओं का निवारण किया गया, पुलिस अधिकारियों ने कई मामलों में दोनों पक्षों में आपसी सुलह से आवेदकों की शिकायतें निपटाई। लेकिन जैसे जनता को पुलिस के इस बेहतर प्रयास का पता चला तो अन्य लोग भी अपना दुखड़ा लेकर पुलिस के दरबार में पहुँच गए। ज्ञात हो कि मीरा भाईदर - वसई विरार पुलिस आयुक्तालय के पुलिस कमिश्नर मधुकर पांडेय ने कहा है कि थाना दिवस कार्यक्रमों में वरिष्ठ अधिकारी भी अपनी सहभागिता सुनिश्चित करेंगे। इन दिवसों के प्रभावी क्रियान्वयन के लिए सह पुलिस आयुक्त और वरिष्ठ पुलिस निरीक्षक उत्तरदायी होंगे। पुलिस स्टेशन में दिवस पर प्राप्त होने वाले आवेदन पत्रों का निराकरण प्रत्येक दशा में अगले ५ दिवस के भीतर कराया जाए। आवेदन पत्रों का निस्तारण गणवत्तापरक ढंग से किया जाना चाहिए। किसी भी दशा में जन शिकायतें व समस्याएं लंबित नहीं



रहनी चाहिए। पुलिस स्टेशन में एक भी पुलिस कांस्टेबल और अधिकारी नही सुनते तो उनपर कड़ी कारवाई कर कंट्रोल में भेज दिया जाएगा। पुलिस ने अनुसार पहले दिन शनिवार को शिकायत दर्जनों से ज्यादा शिकायते प्राप्त हुई है।

# डुंगरी-बिलीमोरा तथा बिलीमोरा-अमलसाड खंडों में पावर और ट्रैफिक ब्लॉक होने के कारण कुछ ट्रेनें प्रभावित

**मुंबई:** रविवार, 22 जनवरी, 2023 को डाउन लाइन पर डुंगरी-बिलीमोरा सेक्शन में पुल संख्या 352 और बिलीमोरा-अमलसाड सेक्शन में पुल संख्या 368 के लिए अप्रोच मार्गों के सुदृढ़ीकरण कार्य के कारण पश्चिम रेलवे की कुछ ट्रेनें प्रभावित होंगी। यह ब्लॉक पुल संख्या 352 के लिए 09.45 बजे से 14.15 बजे तक तथा

CS CamScanner

# पोलिस उपायुक्तांना मैदानी खेळाचा लळा!

**…साद जोशी, वसई**

**…मेरा-भाईंदर वसई-विरार …ोलिस आयुक्तालयाचे …पायुक्त प्रकाश गायकवाड …ाम करताना आरोग्याची …ाळजी घेण्याचा पुरेपूर …यत्न करतात. त्यांच्याकडून …नेकांना प्रेरणा मिळते. …ाढते प्रदूषण आणि …वामानात होणारे बदल …ानवी जीवनावर परिणाम …रतात; पण शारीरिकदृष्ट्या …क्षम राहण्यासाठी व्यायाम …न् मैदानी खेळ किती …हत्त्वाचे आहेत याची …ाणीव गायकवाड यांच्या …तीतून दिसून येते.**




शारीरिक तंदुरुस्ती पोलिस दलात अत्यंत महत्त्वाची मानली जाते. अनेक वेळा व्यग्र दिनचर्येमुळे आरोग्याकडे लक्ष देणे शक्य होत नाही. वेळेवर आहार व झोप न मिळाल्याने आजार बळावत असतात; परंतु असेही पोलिस आहेत जे थोडा वेळ काढून व्यायाम व मैदानी खेळातून शारीरिक-मानसिकरीत्या सुदृढ राहण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यातील एक म्हणजे मिरा-भाईंदर वसई-विरार पोलिस आयुक्तालयाचे प्रकाश गायकवाड. त्यांनी कुस्ती, बॅडमिंटन आणि मॅरेथॉनमध्ये आपली आवड जपली आहे.

प्रकाश गायकवाड मूळचे नाशिकमधील. थेट पोलिस उपअधीक्षक म्हणून ते २००९ मध्ये दलात रुजू झाले. त्यांनी पालघरमध्ये काम केले आहे. त्यानंतर मिरा-भाईंदर वसई-विरार पोलिस आयुक्तालयात उपायुक्त म्हणून जबाबदारी सांभाळली आहे. लहानपणापासूनच त्यांना कुस्तीचे आकर्षण होते. त्यामुळे त्यांनी गावात कुस्तीत सहभाग घेतला. त्यानंतर नाशिक व महाविद्यालयांतूनही ते आखाड्यात उतरले. पोलिस दलात रुजू झाल्यावर वेळ कमी मिळू लागला; परंतु तरीही कुस्तीचे धडे त्यांनी गिरवले. त्याचबरोबर त्यांना बॅडमिंटनचीही आवड आहे. पालघरमध्ये असताना ते बॅडमिंटन खेळत असत. आता पोलिस आयुक्तालयात असतानाही त्यांनी बॅडमिंटन सुरूच ठेवले आहे. रोजचा व्यायाम त्यांच्या दिनचर्येचा भाग झाला आहे. मन व इच्छाशक्तीची परीक्षा देत सकारात्मक प्रेरणा घेऊन गायकवाड विविध ठिकाणी होणाऱ्या मॅरेथॉनमध्येही हिरिरीने सहभाग घेत असतात. आतापर्यंत त्यांनी पुणे, पोलिस मॅरेथॉन, वसई-विरार राष्ट्रीय मॅरेथॉन, नाशिक आणि मुंबईसह विविध भागांत झालेल्या अर्धमॅरेथॉनमध्ये सहभाग घेत फिनिशिंग पॉइंट गाठला आहे. अनेक खेळांची आवड जपत पोलिस दलातच नव्हे; तर समाजापुढेही त्यांनी आदर्श निर्माण केला आहे. आजच्या धकाधकीच्या जीवनात आरोग्याची होणारी हेळसांड पाहता पोलिसांसह नागरिकांनी व्यायाम व मैदानी खेळाला महत्त्व देणे गरजेचे आहे, हे गायकवाड यांच्या इच्छाशक्तीवरून स्पष्ट होते.



**प्रकाश गायकवाड**
पोलिस उपायुक्त

व्यायाम आणि मैदानी खेळाकडे तरुणवर्ग वळला, तर आपसूकच टीव्ही, मोबाईल आणि इंटरनेटच्या जाळ्यातून तो बाहेर येईल. अशा गोष्टीत अडकणार नाही. शारीरिक तंदुरुस्तीसाठी रोज व्यायाम व खेळाकडे वळायला हवे. जेणेकरून त्यातून आपल्याला मानसिक व शारीरिक समाधान मिळेल.

**- प्रकाश गायकवाड,**
पोलिस उपायुक्त



मॅरेथॉनमध्ये सहभागी झालेले प्रकाश गायकवाड.



CamScanner

लोकमत

# वसईत जुगाऱ्यावर कारवाई

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : वसईत मटका जुगाऱ्यावर कारवाई करण्यात आली आहे.

पापडी येथील मच्छी मार्केट जवळ आरोपी आसिफ कल्याणकर (६३) यांनी शुक्रवारी संध्याकाळी सहाच्या सुमारास मटका व जुगाराचे सामान तसेच रोख रक्कम जवळ बाळगली होती. लोकांकडून पैसे घेऊन कल्याण मटका जुगार खेळवला जात असताना वसई पोलिसांनी आरोपीच्या ताब्यातील १५० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

वसई पोलिस ठाण्यात आरोपीविरोधात महाराष्ट्र जुगार अधिनियम कलमाखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विविध ठिकाणी चालणाऱ्या जुगारांवर पोलिस सातत्याने कारवाई करत आहेत.

Hello Vasai
Page No. 3 Jan 22, 2023
Powered by: erelego.com

CamScanner

लोकमत

# चोरीचा ट्रक सापडला

**नालासोपारा :** कर्नाटकातील ट्रकची चोरी केल्याप्रकरणी वालीव पोलिसांनी तीन जणांना अटक केली आहे. १९ जानेवारीला रात्री दहाच्या सुमारास भिवंडी-कामण रोडवर एक हायवा ट्रक उभा केलेला आढळून आला होता. या ट्रकची वालीव पोलिसांनी तपासणी केली असता ट्रक हा कर्नाटक राज्यातील रायचूर येथील शेट्टीनगर परिसरातून चोरी करून त्यानंतर त्यावर बनावट महाराष्ट्र राज्यातील नंबर प्लेट लावली होती. याबाबत तीन आरोपींकडून एकूण २० लाख ३५ हजार १३५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. वालीव पोलिसांनी शुक्रवारी गुन्हा दाखल केला आहे.



CS CamScanner